मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. महासभा दि. २२/०६/२०२६

प्रकरण क्र. २७ :- **दि. २७/०३/२०२६, दि. १७/०४/२०२६ व दि. ०६/०५/२०२६ रोजीचे मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

ठराव क्र. २९ :-

दि. २७/०३/२०२६, दि. १७/०४/२०२६ व दि. ०६/०५/२०२६ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. भगवती शर्मा

अनुमोदक :- ॲड. रवि व्यास

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.२२/०६/२०२६

प्रकरण क्र. 28 :- मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील उपायुक्त या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत...

ठराव क्र.30 :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभागाने मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2019 च्या सुधारणेस मान्यता दिलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत आकृतीबंधानुसार उपायुक्त या संवर्गातील 04 पदे मंजूर आहेत व मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवाचे वर्गीकरण) नियम 2019 नुसार उपायुक्त (गट-अ) या संवर्गाची 02 पदे 50% पदोन्नतीने भरावयाची आहेत.

उपायुक्त (गट-अ) या पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54 (1) अन्वये पदोन्नती निवड समिती गठीत करण्यात आली होती.

उपायुक्त (गट-अ) या संवर्गातील रिक्त पदावर पदोन्नती देणेबाबत विहित कार्यपध्दतीनुसार रिक्त पदांचा व विचार क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचा पदोन्नती देण्याचा प्रस्ताव पदोन्नती निवड समितीसमोर सादर करण्यात आलेला होता. मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. 28306/2017 मधील निर्णयाच्या अधिन राहुन पदोन्नती निवड समितीने पदोन्नती देण्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व पात्रता श्री. स्वप्निल ज्ञानू सावंत यांनी धारण केली असल्याने श्री. स्वप्निल ज्ञानू सावंत यांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात अटीशर्तीच्या अधिन राहून उपायुक्त या पदावर पदोन्नती देणेकरीता शिफारस केली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) नुसार मा. आयुक्त यांनी मा. महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहुन पदोन्नती आदेश दिले असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) नुसार सदर पदोन्नतीस तात्पुरत्या स्वरुपात मा. महासभा मंजूरी देत असून शासनास प्रस्ताव पाठविणेस शिफारस करीत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- अॅड. रवि व्यास

अनुमोदन :- श्री. मदन सिंग

ठराव सर्वानुमते / ~~बहुमताने~~ मंजुर

Dmehta

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २२/०६/२०२६

प्रकरण क्र. २९ :- मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील मुख्य विधी अधिकारी या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत...

ठराव क्र.39:-

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभागाने मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2019 च्या सुधारणेस मान्यता दिलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत आकृतीबंधानुसार मुख्य विधी अधिकारी (वर्ग-01) या संवर्गातील 01 पद मंजूर आहे व मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवाचे वर्गीकरण) नियम 2019 नुसार मुख्य विधी अधिकारी (वर्ग-01) या संवर्गाचे 01 पद 100% पदोन्नतीने भरावयचे आहे.

मुख्य विधी अधिकारी (गट-अ) या पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54 (1) अन्वये पदोन्नती निवड समिती गठीत करण्यात आली होती.

मुख्य विधी अधिकारी (गट-अ) या संवर्गातील रिक्त पदावर पदोन्नती देणेबाबत विहित कार्यपध्दतीनुसार रिक्त पदांचा व विचार क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचा पदोन्नती देण्याचा प्रस्ताव पदोन्नती निवड समितीसमोर सादर करण्यात आलेला होता. मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 मधील निर्णयाच्या अधिन राहुन पदोन्नती निवड समितीने पदोन्नती देण्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व पात्रता श्रीम. सई हेमंत वडके यांनी धारण केली असल्याने श्रीम. सई हेमंत वडके यांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात अटीशर्तीच्या अधिन राहून मुख्य विधी अधिकारी या पदावर पदोन्नती देणेकरीता शिफारस केली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) नुसार मा. आयुक्त यांनी मा. महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहुन पदोन्नती आदेश दिले असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) नुसार सदर पदोन्नतीस तात्पुरत्या स्वरुपात मा. महासभा मंजूरी देत असून शासनास प्रस्ताव पाठविणेस शिफारस करीत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- Madan Singh
श्री. मदन सिंग

अनुमोदन :- Dinesh
श्री. दिनेश जैन

ठराव सर्वानुमते / ~~बहुमताने~~ मंजुर

Dmehta

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.22/06/2026

प्रकरण क्र. 30 :- मिरा भाईंदर महानगरपालिका शाळांसाठी शिक्षक मिळणेबाबत. (इयत्ता आठवी ते इयत्ता दहावी च्या विद्यार्थ्यांकरीता शिक्षक व क्रिडा शिक्षक मिळणेबाबत)

ठराव क्र. ३२ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकरिता 25 माध्यमिक व 05 क्रीडा असे एकूण 30 शिक्षक यांची आवश्यकता आहे. सबब शिक्षण विभागाने सादर केलेल्या प्रस्तावान्वये विद्यार्थ्यांची संख्या पहाता व विद्यार्थ्यांना गुणवत्ता वाढ व सर्वांगीण विकास होण्यासाठी माध्यमिक शाळांमध्ये विषयनिहाय माध्यमिक विभागासाठी गणित 05 शिक्षक, विज्ञानसाठी 04 शिक्षक, मराठी 04 शिक्षक, समाजशास्त्रसाठी 04 शिक्षक, हिंदी भाषा 01 शिक्षक,गणित उर्दू भाषा 01 शिक्षक, इंग्रजी 05 शिक्षक, समाजशास्त्रसाठी उर्दू भाषा 01 शिक्षक, व 05 क्रीडा शिक्षक, असे एकूण 30 शिक्षकांची प्रति रु.25,000/- मासिक ठोक मानधनावर 11 महिन्याकरीता नियुक्तीसाठी थेट मुलाखतीकरिता जाहीर सूचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व जाहीर वृत्तपत्रात प्रसिध्द करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास रक्कम रु.82,50,000/- (अक्षरी रक्कम रु. ब्याऐंशी लाख पन्नास हजार मात्र) ही सभा मान्यता देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- Rameshe
श्रीमती ज्योत्स्ना हसनाळे

अनुमोदन :-
श्री. अनिल वि. भोसले

ठराव सर्वानुमते / ~~बहुमताने~~ मंजुर

Dmehta
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २२/०६/२०२६

प्रकरण क्र. ३१ :- मा. महासभा ठराव क्र. ११, दि. १८/०२/२०२६ बाबत फेर विचार करुन निर्णय घेणे. दि. १ एप्रिल २०२६ पासुन बाजार फी वसुली दर कमी करणे व सद्यस्थितीत सुरु असलेल्या ठेक्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेबाबत.

ठराव क्र. 33 :-

मिरा भाईंदर शहरातील फेरीवाल्यांकडून वसुल करण्यात येणाऱ्या बाजार फी मध्ये दि. १८/०२/२०२६ रोजीच्या महासभेत फेरबदल करण्यात आले होते. फेरबदल केल्यानंतर बाजार फी वसूली करणाऱ्या ठेकेदाराने फेरबदल मान्य न केल्यास नवीन निविदा प्रसिद्ध करण्याकरीता मंजुरी दिली होती.

सदयस्थितीत बाजार फी वसुली करणारा ठेकेदार मे. ODS Protective Services Pvt. Ltd. यांनी मा. महासभेने पारीत केलेल्या ठरावानुसार कमी केलेल्या दराप्रमाणे बाजार फी वसूली करून महापालिकेने निश्चित केलेला मासिक हफ्ता मनपा फंडात जमा करण्याचे मान्य केल्याबाबत पत्र महापालिकेला दिले आहे. प्रशासनाने फेरविचारार्थ दिलेल्या प्रस्तावाप्रमाणे सदयस्थित संबंधित ठेकेदाराकडून ठेक्याची मुदत संपेपर्यंत बाजार फी वसुली चालु ठेवण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल **अनुमोदन :- श्री. अशोक तिवारी**

अ.क्र.	ठरावाच्या बाजूने	अ.क्र.	ठरावाच्या विरोधात	तटस्थ
१	मेहता डिंपल विनोद	१	आफरीन मुझफ्फर हुसेन सय्यद	निरंक
२	ध्रुवकिशोर मन्साराम पाटील	२	जय राजेंद्र ठाकूर	
३	ॲड. रवि व्यास	३	अनिल दिवाकर सावंत	
४	सिंह मदन उदितनारायण	४	पाटील वंदना विकास	
५	भगवती तुगनचंद शर्मा	५	बगाजी शर्मिला विन्सन	
६	गेहलोत हसमुख मोहनलाल	६	शेख रुबिना फिरोज	
७	ज्योत्सना जालींदर हसनाळे	७	सौ.रुबिना फैजूल्ला शेख	
८	गोहील शानू जोरावरसींग	८	आयरिन पॉल कॉड्रस	
९	भानुशाली वर्षा गिरधर	९	रिजवाना अनवर खान	
१०	वंदना मंगेश पाटील	१०	सना खलील देशमुख	
११	तिवारी अशोक सुर्यदेव	११	डिमेलो फ्रिडा बर्नड	
१२	सिंग श्रीप्रकाश जिलेदार	१२	सुनिल चंपालाल चौधरी	
१३	भट दिप्ती शेखर	१३	तारेन वेंचर मेंडोन्सा	
१४	नयना गजानन म्हात्रे	१४	रफिक गुलाब पठाण	
१५	गणेश गोपाळ शेट्टी	१५	अशरफ अहमद मिस्त्री	
१६	प्रेमनाथ गजानन पाटील	१६	शॉन लिओ कोलासो	

१७	भोसले अनिल बाबुराव		
१८	सुरेश खंडेलवाल		
१९	मोहन गोपाळ म्हात्रे		
२०	जैन दिनेश तेजराज		
२१	भोईर जयेश वत्सला भानुदास		
२२	शाह राकेश रतिशचंद्र		
२३	स्नेहा शैलेश पांडे		
२४	अरोरा दिपीका पंकज		
२५	सिमा कमलेश शाह		
२६	गुप्ता कुसुम संतोष		
२७	पंकज पांडेय (दरोगा)		
२८	लक्ष्मण गणपत जंगम		
२९	थेराडे संजय अनंत		
३०	आनंद दत्ताराम मांजरेकर		
३१	दुबे मनोज रामनारायण		
३२	अनिल रवजीभाई विराणी		
३३	मयेकर रजनीकांत पांडुरंग		
३४	परेश जयंतीलाल शाह		
३५	परमार हेतल रतीलाल		
३६	जैन सुनिता रमेश		
३७	सुरेखा प्रकाश सोनार		
३८	भावसार वंदना संजय		
३९	बेलानी हेमा राजेश		
४०	वैती विजया हेमचंद्र		
४१	रुपाली शिंदे मोदी		
४२	तरुण सुभाष शर्मा		
४३	सावंत दिपक कल्याणराव		
४४	डोंगरे सचिन सुरेश		
४५	मनिष प्रितम पराशर		
४६	नवीन गुप्तेश्वर सिंह		
४७	विवेक महेंद्र उपाध्याय		
४८	संजय बाळाजी पवार		
४९	पारधी तुषार यशवंत		
५०	कोठारी भरतकुमार नथमलजी		
५१	विशाल जगन्नाथ पाटील		
५२	नीला सोन्स		
५३	करुणा किशोर पाटील		

५४	शर्मा मानशी रमेश		
५५	दिव्या प्रसाद परब		
५६	योगिता सतीशचंद्र शर्मा		
५७	प्रियंका करणीदान चारण		
५८	स्मिता विशाल पाटील		
५९	मेबल नोएल कोरीया		
६०	डॉ. भव्या पिपलिया (शाह)		
६१	आभा अमेय पाटील		
६२	किमया सुहास रकवी		
६३	विरकर आकांक्षा शंकर		
६४	यशोदा अनिल ताटे		
६५	जैन प्रिती चंद्रकांत		
६६	ॲड. श्रध्दा संदिप कदम		
६७	दत्ता जया रथीन		
६८	त्रिपाठी कविता सुशील		
६९	जाट प्रतिभा चंदु		
७०	ॲड. मयुरी सचिन म्हात्रे		
७१	कांबळी श्रध्दा सुधीर		
७२	मनस्वी प्रमोद पाटील		

ठराव बहूमताने मंजूर

Dmehta

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २२/०६/२०२६

प्रकरण क्र. ३२ :- मनपा शाळांमध्ये डिजिटल क्लासरूम तयार करुन E-Learning द्वारे शिक्षण देणेकामी ई-निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्र :- ३४

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मराठी, हिंदी, गुजराती, उर्दू व सेमी इंग्रजी माध्यमाच्या एकूण 36 शाळा कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांना आधुनिक व गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी डिजिटल क्लासरूम व E-Learning प्रणाली प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने मनपा शाळांमध्ये एकूण किती वर्गखोल्या आहेत, सध्या किती वर्गांमध्ये डिजिटल क्लासरूम व E-Learning सुविधेद्वारे विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते, कोणत्या इयत्तांतील विद्यार्थ्यांना या सुविधेचा लाभ दिला जातो तसेच किती वर्गखोल्यांमध्ये डिजिटल क्लासरूमची सुविधा उपलब्ध करून देणे शिल्लक आहे, तसेच शाळा दत्तक योजना राबविण्याचा महापालिकेचा मानस आहे, त्या संदर्भात मिरा भाईंदर शहरातील नामांकीत शैक्षणिक संस्था यांच्यासमवेत बैठक झाली असून सर्वच शैक्षणिक संस्थांनी या उपक्रमास सकारात्मक भुमिका दर्शविली आहे. प्रशासनाने या संपुर्ण बाबींचा विचार करून डिजिटल क्लासरूम तयार करुन E-Learning द्वारे शिक्षण देणेकामीचा सविस्तर अहवाल व प्रस्ताव तयार करून माहितीसह फेर प्रस्ताव सादर करण्यास मा. महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- Kadam

अॅड. श्रध्दा कदम

अनुमोदन :-

श्रीमती दिपीका अरोरा

ठराव सर्वानुमते / ~~बहुमताने~~ मंजुर

Mehta

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.२२/०६/२०२६

प्रकरण क्र. ३३ :- मिरा भाईंदर महानगरपालिका मनपा. मुख्य कार्यालय इमारत व प्रभाग कार्यालय १ ते ६ इमारत, मनपा. शाळा व मनपा. इतर इमारती मधील दैनंदिन साफसफाई (हाऊस किपींग) करणे कामास मुदतवाढ मिळणेबाबत.

ठराव क्र :- ३५

मिरा भाईंदर महानगरपालिका मनपा. मुख्य कार्यालय इमारत व प्रभाग कार्यालय १ ते ६ इमारत तसेच मनपा. शाळा व मनपाच्या इतर इमारती मधील दैनंदिन साफसफाई (हाऊस किपींग) करणेकामी निविदेची मुदत दि.१३/०३/२०२६ रोजी संपुष्टात येणार होती. मुदत संपण्यापुर्वी प्रशासनाने नवीन निविदा प्रकिया करणे गरजेची होती पण तसे केले नाही. प्रशासनाने या कामात विलंब करुन संबधित ठेकेदारास सहकार्य केले.

तसेच सदर कामाची निविदा प्रक्रिया करणेकामी दि.२७/०३/२०२६ रोजीच्या महासभेत ठरावाव्दारे आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली होती. आजतागायत प्रशासनातर्फे निविदा प्रक्रिया पुर्ण झाली नाही. सदरचे काम अत्यावश्यक सेवेत येत असताना प्रशासनातर्फे दिरंगाई झाल्याची पुन्हा दिसून येत आहे. नवीन निविदा प्रक्रिया लवकरात लवकर आणि युद्धपातळीवर पूर्ण करण्याबाबत तातडीने कार्यवाही करणेस ही महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- Patil

सौ.म. वंदना मंगेश पाटिल

अनुमोदन :- Dinesh

श्री. दिनेश जैन

ठराव सर्वानुमते / ~~बहुमताने~~ मंजुर

Dmehta

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका
मा. महासभा दि २२/०६/२०२६

प्रकरण क्र ३४ - मिरा-भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१९ मध्ये बद्दल करणे बाबत.

ठराव क्र - ३६

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये पदोन्नती संदर्भात नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले आहे. काही अधिकारी व कर्मचाऱ्यांना नियमबाह्य पद्धतीने पदोन्नती देण्यात आलेली असून अनेक पात्र अधिकारी व कर्मचारी यांना हेतुपुरस्सर पदोन्नतीपासून वंचित ठेवण्यात आले आहे.

निलंबनाच्या कार्यकाळात वेतन, भत्ते व फरक देताना भेदभाव करण्यात आलेला असल्याचे आढळून येते. तसेच पदोन्नती प्रक्रियेत वेगवेगळे व सोयीस्कर निकष लागू करून. विशेषतः श्री. दिनेश कानगुडे, श्री. यशवंत देशमुख, श्रीकृष्ण मोहिते, श्री. प्रशांत जानकर व इतर अधिकारी/कर्मचारी यांना अद्यापही पदोन्नती देण्यात आलेली नाही. काही कर्मचारी अनेक वर्षे एकाच पदावर कार्यरत असून इतरांना उच्च पदांवर नियुक्त करण्यात आलेले आहे, यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे.

निवड समितीमार्फत पदोन्नती देताना चुकीचे अहवाल सादर करून प्रशासनाची दिशाभूल करण्यात आलेली असून भ्रष्टाचार व अनियमितता झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच, सेवा प्रवेश नियमामध्ये दुरुस्ती करणाऱ्या गठीत समितीने प्राप्त निवेदनांची योग्य चौकशी व कागदपत्रांची पडताळणी न करता चुकीच्या शिफारशी करून नियमबाह्य पदोन्नती दिल्याचे दिसून येते.

पालिकेच्या विविध विभागामार्फत सेवा प्रवेश नियमामध्ये आवश्यक बद्दल सुचविण्याचा प्रस्ताव सेवा प्रवेश नियमामध्ये दुरुस्ती करणाऱ्या गठीत समितीने विचारात घेतला नाही.

कालबद्ध पदोन्नती काही कर्मचारी / अधिकाऱ्यांना दिली आहे, काहींवर अन्याय करून त्यांना कालबद्ध पदोन्नती दिली नाही आजही ते खालच्या पदावर काम करीत आहे.

10, 20, 30 चा लाभ अनेक अधिकारी, कर्मचारी यांना देण्यात आला परंतु काही कर्मचारी / अधिकारी यांना या लाभापासून यापासून वंचित ठेवण्यात आले आहे.

काही दबंग अधिकाऱ्यांना मागील तारखेपासून (Back Date Effect) पदोन्नती देण्यात आलेली असताना इतरांना तोच लाभ देण्यात आलेला नाही.

प्रशासकीय काळात आयोजित करण्यात आलेल्या अधिकारी कर्मचारी भरती प्रक्रियेत अनियमित्ता आढळून आलेली होती. भरती प्रक्रियेत पालिकेचे नियंत्रण नव्हते मोठ्या प्रमाणावर गैर व्यवहार, भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यामुळे सदर भरती प्रक्रिया रद्द करून सेवा प्रवेश नियमांमध्ये आवश्यक दुरुस्ती केल्यानंतर नवीन भरती प्रक्रिया करावी.

प्रशासनाने श्री दिनेश कानगुडे श्रीकृष्ण मोहिते श्री. यशवंत देशमुख श्री. प्रशांत जानकर व इतरांच्या प्रलंबित पदोन्नती द्याव्यात तसेच निलंबन कार्यकाळात काही अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे भत्ते / पगार / फरक देणे बाकी असल्याने त्यांना देण्यात यावे त्यानंतर प्रशासनाने सेवा प्रवेश नियम २०१९ मध्ये आवश्यक दुरुस्ती करून सुधारित प्रस्ताव सुधारणा करण्या करिता महासभेपुढे सादर करण्यात यावा. असा मी ठराव मांडत आहे.

सूचक - श्री. भगवती शर्मा

अनुमोदक - श्री. दिनेश जैन

ठराव सर्वानुमते / ~~बहुमताने~~ मंजूर

महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.२२/०६/२०२६

प्रकरण क्र. ३५ :- गणेश उत्सव व नवरात्र उत्सवाकरीता मुर्ती बनविणे व विक्री करिता तात्पुरते मंडप परवानगीचे दर निश्चित करून देणेबाबत.

ठराव क्र :- ३७

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात गणेशोत्सव, नवरात्रोत्सव साजरा केला जातो. गणेशोत्सव, नवरात्रोत्सव हा नागरीकांच्या धार्मिक श्रध्देचा व सांस्कृतिक एकतेचा एक महत्वाचा सण आहे. शहरातील मुर्तीकार व विक्रेते यांना प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याने मुर्ती केंद्रांना खाजगी जागा व विक्री केंद्राना सार्वजनिक जागेवर तात्पुरत्या स्वरुपात मंडप उभारणेकामी खालीलप्रमाणे दर निश्चित करण्यात येत आहेत.

अ) खाजगी जागेत मुर्ती बनविणे व विक्री करणेकरीता मंडप उभारणे.
दर प्रती माह रु.५/- प्रती स्के.फुट

ब) सार्वजनिक जागेत मंडप परवानगी (मुर्ती विक्रीकरीता)
रु.५,०००/- प्रती माह (२५० स्के.फुटापर्यंत)
२५१ स्के.फुट व त्यावरील जागेकरीता रु.२०/- प्रती स्के.फुट प्रती माह.

क) खाजगी जागेत मंडप परवानगी (मुर्ती विक्रीकरीता)
रु.५,०००/- प्रती माह (२५० स्के.फुटापर्यंत)
२५१ स्के.फुट व त्यावरील जागेकरीता रु.१०/- प्रती स्के.फुट प्रती माह.

ड) पर्यावरणपूरक (शाडू मातीची मुर्ती Ecofriendly) मुर्ती बनविणेस प्रोत्साहन देणेकरीता मुर्ती बनविणे व विक्री करणेकरीता, मुर्ती विक्रीकरीता मंडप परवानगी नि:शुल्क द्यावी.
(या मंडपात फक्त पर्यावरणपूरक मुर्ती असाव्यात, या व्यतिरीक्त मुर्ती आढळल्यास अ.क्र. "ब" प्रमाणे दहापट दंडात्मक कारवाई करावी व परवानगी रद्द करुन मंडप काढण्यात यावा.)

इ) मंडप उभारणेस अग्निशमन ना हरकत दाखला फी, दर रु.२,१००/- मंडपात आग प्रतिबंधात्मक यंत्रणा लावणे अनिवार्य असेल

ई) विना परवानगी मंडप उभारुन मुर्ती बनविणे व विक्री केल्यास दहापट दंड आकारुन मंडप काढण्यात यावा.

उ) मंडपाची परवानगी घेतल्यानंतर त्यापेक्षा जास्त मंडप उभारल्यास दहापट दंड आकारुन मंडप काढण्यात यावा.

ऊ) परवानगची प्रत मंडपाच्या दर्शनी भागात लावण्यात यावी.

खाजगी तसेच सार्वजनिक स्वरुपाच्या जागेमध्ये मंडपासाठी (रस्ते खेळाचे मैदान इ. वगळून) शुल्काचा भरणा केल्यानंतर तात्पुरत्या स्वरुपात प्रभाग स्तरावर परवानगी देण्यात यावी, असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- [illegible]

श्री. सावंत दिपक कमाणाराव

अनुमोदन :- [illegible]

एस.मुरव मो. जलील

ठराव सर्वानुमते / ~~बहुमताने~~ मंजुर

Dmehta

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.22/06/2026

प्रकरण क्र. 36 :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जलजोडणीधारकांना स्मार्ट डिजीटल मिटर बनविणेकामी धोरण निश्चित करणेबाबत...

ठराव क्र :- 3८

मिरा-भाईंदर महानगरपालिकेस निकट भविष्यात सुर्या पाणी पुरवठा योजनेतून सुमारे २१८ एमएलडी पाणी उपलब्ध होणार आहे. या पार्श्वभूमीवर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व जलजोडणीधारकांना स्मार्ट डिजिटल मीटर बसविणे आवश्यक आहे.

स्मार्ट डिजिटल मीटर प्रणालीमुळे नागरिकांना समप्रमाणात पाणीपुरवठा करणे, पाणी गळती शोधणे, पाण्याचे ऑडिट करणे, मीटर रीडिंग अचूकपणे मिळविणे, जलप्रवाहाचे योग्य मापन करणे, तसेच कंट्रोल व्हॉल्वच्या माध्यमातून पाणीपुरवठा सुरू व बंद करणे शक्य होईल. मीटर रीडिंगसाठी लागणारे मनुष्यबळ कमी होऊन महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल व अचूक बिलिंगसाठी देखील मदत होईल.

त्या अनुषंगाने, प्रशासनाने स्मार्ट डिजिटल मीटर, संबंधित सॉफ्टवेअर व बिलिंग प्रणाली यांसाठी नामांकित व अनुभवी कंपन्यांकडून सविस्तर प्रस्ताव मागवून सखोल अभ्यास करावा व दोन महिन्यांच्या आत अहवाल महासभेस सादर करावा.

तसेच, सध्या पावसाळा उशिरा सुरू झाल्यामुळे धरणांतील पाणीसाठा कमी झाला असून संपूर्ण महाराष्ट्रात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे. पाटबंधारे विभागामार्फत २०% पाणी कपातीचा निर्णय जाहीर करण्यात आलेला आहे. परिणामी, शहरामध्ये तात्पुरत्या स्वरूपात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे.

सबब पाणी कपात रद्द होईपर्यंत प्रशासनाने नविन जलजोडणी मंजूर करण्यास स्थगिती द्यावी. पाण्याच्या व्यावसायिक वापरावर कडक निर्बंध लादावे, पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, पाणी गळती शोधून ती तत्काळ नियंत्रणात आणावी, पाणी बचतीबाबत व्यापक जनजागृती करण्यासही ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :-

अनुमोदन :-

HASMUKH M. GEHLOT

श्री. हसमुख मो. गेहलोत

श्री. भगवती शर्मा

ठराव सर्वानुमते / ~~बहुमताने~~ मंजुर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा ठराव दि.२२/०६/ २०२६

प्रकरण क्र. ३७ :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पुर्व) येथील जेसलपार्क व मिरारोड (पुर्व) येथील सृष्टी, शांतीनगर सेक्टर ०३ व शांतीनगर सेक्टर ०८ या मलनि:सारण केंद्रांची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे या कामास मुदतवाढ व वाढीव खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत...

ठराव क्र. ३९ :-

मिरा भाईंदर क्षेत्रातील जेसलपार्क मलनि:सारण केंद्राची व शांतीनगर सेक्टर ०३, शांतीनगर सेक्टर ०८ व सृष्टी परिसरातील इमारतींच्या सांडपाण्यावर योग्यरितीने प्रक्रिया होणेकरीता जेसलपार्क मलनि:सारण केंद्राची व शांतीनगर सेक्टर ०३, शांतीनगर सेक्टर ०८ व सृष्टी संदर्भिय पत्रान्वये मे. फ्रेन्ड्स इंजिनिअरींग कॉर्पोरेशन यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कामास दोन महिने मुदतवाढ व मा. विशेष महासभा दि. २७/०३/२०२६, ठराव क्र. ३२ अन्वये सुधारीत खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामाची नविन निविदा प्रक्रिया सुरु असून महाराष्ट्र विधान परिषदेव्दारे ठाणे स्थानिक प्राधिकारी मतदार संघाची व्दिवार्षिक निवडणूक २०२६ च्या आचारसंहितेमुळे निविदा प्रक्रियासाठी विलंब होऊन निविदा प्रक्रिया पुर्ण होणेस ऑगस्ट २०२६ पर्यंतचा कालावधी प्रशासनाला अपेक्षित आहे.

सदर मलनि:सारण केंद्रांची देखभाल दुरुस्तीची कामे नियमित सुरु ठेवणेसाठी दि.३१/०८/२०२६ पर्यंत मंजुर दराने रु.२६,२१,८६२/- वाढीव खर्चास व २९८.४९ लक्ष या सुधारीत रक्कमेस आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेस ही महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- Shanu Gohil (SHANU GOHIL)

अनुमोदन :- Hetal (Hetal Parmar)

ठराव सर्वानुमते / ~~बहुमताने~~ मंजुर

Dmehta

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा ठराव दिनांक २२/०६/२०२६

प्रकरण क्र. ३८ :- ठाणे येथील साकेत व कापुरबावडी व भाईंदर (पुर्व) फाटक येथील पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे या कामास मुदतवाढ व वाढीव खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत...

ठराव क्र. ४० :-

मिरा भाईंदर शहरास पाणी पुरवठा करणेकरीता ठाणे येथील साकेत व कापुरबावडी तसेच भाईंदर (प) विभागात योग्य दाबाने पाणी पुरवठा होणेकरीता भाईंदर (पुर्व) फाटक येथे पंपिंग स्टेशन बांधण्यात आलेले आहेत. सदर पंपिंग स्टेशनची देखभाल दुरुस्ती करणेकरीता संदर्भिय पत्रान्वये मे. ॲकॉर्ड वॉटरटेक इन्फ्रा. प्रा. लि. यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कामास दोन महिने मुदतवाढ व मा. विशेष महासभा दि. २७/०३/२०२६, ठराव क्र. ३२ अन्वये सुधारीत खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामाची नविन निविदा प्रक्रिया सुरु असून महाराष्ट्र विधान परिषदेव्दारे ठाणे स्थानिक प्राधिकारी मतदार संघाची व्दिवार्षिक निवडणूक २०२६ च्या आचारसंहितेमुळे निविदा प्रक्रियासाठी विलंब होऊन निविदा प्रक्रिया पुर्ण होणेस ऑगस्ट २०२६ पर्यतचा कालावधी अपेक्षित आहे.

सदर पंपिग स्टेशनची देखभाल दुरुस्तीची कामे नियमित सुरु ठेवणेकरीता दि.३१/०८/२०२६ पर्यंत मंजुर दराने रु.३२,८७,९५६/- वाढीव खर्चास व ३७४.३२ लक्ष या सुधारीत रक्कमेस आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेस ही महासभा मंजुरी देत आहे.

सुचक :- Dinesh

श्री. दिनेश जाधव

अनुमोदन :- श्री. मनोज दुबे

ठराव सर्वानुमते / ~~बहुमताने~~ मंजुर

Dmehta

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.22/06/2026

प्रकरण क्र. ३९ :- मिरा भाईंदर शहराच्या विकास योजनेतील विकास योजना रस्ते (DP रस्ते) विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात विकसीत करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र :- ४१

मिरा-भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेतील विकास योजना रस्ते (डी.पी. रस्ते) विकसित करण्यासाठी UDCPR मधील विनियम क्र.११.२.५ अन्वये तरतूद करण्यात आलेली आहे. तथापि, प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना विविध अडचणी निर्माण होत असून रस्ते विकासाची गती मंदावलेली आहे.

डी.पी. रस्ते सिमेंट काँक्रीट स्वरूपात विकास हक्क प्रमाणपत्र (TDR) यांच्या मोबदल्यात विकसित केल्यास महानगरपालिकेवर येणारा आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो. त्या दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी –

1) विकासकाच्या मालकीच्या जागेत डी.पी. रोड आरक्षित असल्यास, UDCPR मधील तरतुदीनुसार संबंधित विकासकास सिमेंट काँक्रीट रस्ता विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात बांधण्यास परवानगी देण्यात यावी.
2) विकासकाच्या जागेसह महानगरपालिकेकडे हंस्तातरीत केलेल्या जागेत डि.पी रोड आरक्षित असल्यास संबंधित विकासकास सिमेंट कॉक्रीट रस्ता विकास हक्क प्रमाण पत्राच्या मोबदल्यात बांधण्यास परवानगी देण्यात यावी.
3) विकासकाच्या जागेसह इतर खासगी मालकांच्या जागेत डी.पी. रोड आरक्षित असल्यास, सर्व संबंधित जागामालकांनी ना हरकत प्रमाणपत्र दिल्यास त्या विकासकास सिमेंट काँक्रीट रस्ता विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात बांधण्यास परवानगी देण्यात यावी.
4) विकासकाच्या जागेसह व इतर खाजगी मालकांच्या जागेत डि.पी रोड आरक्षित असल्यास, त्याजागा मालकांनी ना हरकत प्रमाण पत्र देण्यास नकार दिल्यास महापालिकेने मध्यस्थीची भुमिका घेऊन समन्वय साधून विकासकास सिमेंट कॉक्रीट रस्ता विकासहक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात बांधण्यास परवानगी द्यावी.

तसेच, बांधकाम विभागाने सिमेंट काँक्रीट रस्त्यांचे सविस्तर अंदाजपत्रक (Estimate) तयार करून संबंधित विकासकास कार्यादेश द्यावा. रस्त्याच्या बांधकामाच्या प्रगतीनुसार टप्प्याटप्प्याने विकास हक्क प्रमाणपत्र (TDR) देण्यात यावे.

विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात बांधण्यात येणाऱ्या डी.पी. रस्त्यांबाबतचा सविस्तर अहवाल मा. स्थायी समितीसमोर वेळोवेळी अवलोकनार्थ सादर करण्यात यावा. असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- ॲड. रविंद्र

अनुमोदन :- दशनिकांत म्हात्रे

ठराव सर्वानुमते / ~~बहुमताने~~ मंजुर

D Mehta

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.22/06/2026

प्रकरण क्र. 40 :- मिरा भाईंदर शहराच्या विकास योजनेतील आरक्षण विकसीत करणेबाबत विचार विनियम करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. :- ४२

मिरा-भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेतील विविध प्रकारची आरक्षणे अद्याप मोठ्या प्रमाणात विकसित झालेली नाहीत. महानगरपालिकेची सध्याची आर्थिक स्थिती व मर्यादित उत्पन्न यामुळे सर्व आरक्षणे स्वखर्चाने विकसित करणे शक्य होत नाही. अनेक ठिकाणी आरक्षणाच्या जागा अपूर्ण ताब्यात असून त्या रिक्त पडून असल्याने अतिक्रमणे होण्याची शक्यता वाढत आहे.

नवीन UDCPR नियमांनुसार उपलब्ध पर्याय असूनही मागील काही वर्षांत आरक्षण विकासाचे प्रमाण अत्यल्प राहिले आहे. या पार्श्वभूमीवर, आरक्षणे जलद गतीने विकसित होण्यासाठी व महानगरपालिकेवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे निर्णय घेणे आवश्यक आहे.

1. मार्केट, पार्कींग व बेघरांसाठी घरे - सदर प्रकारची आरक्षणे समावेशक आरक्षण अंतर्गत विकसित न करता महानगरपालिकेने स्वतः विकसित करावीत. यासाठी संबंधित जागा विकास हक्क प्रमाणपत्र (TDR), खाजगी वाटाघाटी किंवा भूसंपादनाद्वारे ताब्यात घेण्यात याव्यात.
2. महापालिकेकडे आराक्षणातील 50% पेक्षा कमी जागा ताब्यात असल्यास - महापालिकेने शासन निर्णयानुसार सदर जागेची विक्री निविदा प्रक्रिये द्वारे करावी. निविदाधारकास सदर आरक्षण तीन महिन्यांच्या आत विकसित करण्याचे काम सुरु करण्याच्या अट टाकण्यात यावी. ठरावीक कालावधीत काम पुर्ण न केल्यास अटीचे उल्लघंन मानून जागा बांधकामसह असल्यास (असेल त्या स्थितीत / जैसे तेथे स्थितीत / वर्तमान परिस्थितील जागा) जप्त करावी व पालिकेला विक्रीच्या मोबदल्यात मिळालेल्या रक्कमेची 50% रक्कम जप्त करुन उर्वरित रक्कम परत करावी.
3. विकासकाकडे ५०% पेक्षा जास्त जागा असल्यास - आरक्षणातील उर्वरित जागा महानगरपालिका व इतर खासगी मालकांकडे असल्यास, विकासकास या दोन्ही जागा आरक्षण विकसित करण्याकरीता आवश्यक आहे. विकासकाने भूसंपादन खर्च महापालिकेत भरण्याची तयारी दर्शविल्यास महानगरपालिकेनी आपली जागा नियमानुसार विक्री करून त्याची पूर्ण रक्कम मनपा निधीत जमा करावी. उर्वरित खासगी जागा भूसंपादनाद्वारे मिळवून त्याचा खर्च विकासकाकडून वसूल करावा. संपूर्ण जागा उपलब्ध झाल्यानंतर विकासकास आरक्षण विकसित करण्यास परवानगी द्यावी. ३ महिन्यांत काम सुरू करून ठराविक कालावधीत काम पूर्ण करण्याची अट

घालावी. अटींचे उल्लंघन झाल्यास सदर जागा बांधकामासहित असल्यास (असेल त्या स्थितीत / जैसे तेथे स्थितीत / वर्तमान परिस्थितीतील जागा) पालिकेने जप्त करावी व पालिकेला विक्रीच्या मोबदल्यात मिळालेल्या रक्कमेची 50% रक्कम जप्त करुन उर्वरित रक्कम परत करावी.

ज्या प्रकरणांमध्ये जागा ताब्यात येत नाही, त्या ठिकाणी महानगरपालिकेने वाटाघाटी, भूसंपादन व समन्वयाची भूमिका घेऊन विकासकांना सहकार्य करावे. त्यामुळे आरक्षण विकासाला गती मिळेल व मनपाला उत्पन्न प्राप्त होईल. विकास योजनेतील जास्तीत जास्त आरक्षण विकसित करणेकरीता आवाहन करून विकासकांना व इच्छुकांना सहकार्य केल्यास नागरीकांना जास्तीत जास्त विविध आरक्षणातील सेवासुविधांचा लाभ घेता येईल. या दृष्टीने प्रशासनाने कार्यवाही करावी असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- Dinesh
श्री. दिनेश जैन

अनुमोदन :-
श्री. भगवती शर्मा

ठराव सर्वानुमते / [redacted]ने मंजुर

Mehta
महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.२२/०६/२०२६

प्रकरण क्र.४१ :- बी.एस.यु.पी. योजनेतील उर्वरित लाभार्थ्यांना पीपीपी तत्वावर पुर्नवसन करणेसाठी महाराष्ट्र सार्वजनिक खाजगी भागिदारी धोरण २०२६ अन्वये सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी तज्ञ / अनुभवी सल्लागार नेमणेबाबत.

ठराव क्र. :- ४३

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत "शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे" (BSUP) या उपक्रमा अंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे काशी येथील सर्व्हे क्र.९०,९४,१०७/१ अ व मौजे. मिरा येथील सर्व्हे क्र.७८ व ८० चे एकुण ८१७८६.९१३ चौ. मीटर क्षेत्रावरील शासकीय जागेवर सदर योजना मंजूर करण्यात आली होती.

जनतानगर व काशीचर्च झोपडपट्टीमधील प्रकल्पाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

अ.क्र.	तपशील	लाभार्थी / सदनिका संख्या
१.	एकूण मंजूर घरांचा प्रस्ताव	४,१३६ लाभार्थी
२.	संक्रमण शिबिरात (Transit Camp) स्थलांतरित केलेले	२,३५० झोपडीधारक
३.	प्रत्यक्ष सदनिकांचे वाटप पूर्ण	४७३ लाभार्थी
४.	सद्यस्थितीत बांधकाम सुरू असलेल्या सदनिका	१,६८७ सदनिका
५.	अद्याप बांधकाम बाकी असलेल्या सदनिका	१,९७६ सदनिका

सद्यस्थितीत सदर प्रकल्पास केंद्र व राज्य शासनाचे अनुदान बंद झाल्याने बी.एस.यु.पी. प्रकल्प तांत्रिकदृष्ट्या बंद झाला आहे. सध्या सुरू असलेले काही इमारतींचे बांधकाम महानगरपालिकेच्या निधीतुन व एम.एम.आर.डी.ए कडून घेतलेल्या कर्जातून केले जात आहे. यामुळे महानगरपालिकेवर प्रचंड आर्थिक भार पडत आहे.

पी.पी.पी. तत्वावर उर्वरित १९७६ झोपडीधारकांच्या सदनिकांचे बांधकाम केल्यास महानगरपालिकेस आर्थिक भुर्दंड बसणार नाही.

नवीन यु.डी.पी.सी.आर अन्वये एफ.एस.आय मध्ये वाढ झाली असल्याने पालिकेला सपूर्ण जागेत किती एफ.एस.आय मिळणार आहे, त्यापैकी किती एफ.एस.आय झोपडपट्टीधारकांना द्यावा लागेल या संपुर्ण प्रकल्पाकरीता येणारा खर्च वजा जाता पालिकेला मिळणारे महसूल/उत्पन्न या सर्व तांत्रिक बाबी तपासण्याकरीता तसेच शासन धोरणानुसार पी.पी.पी. तत्वावर / खाजगी विकासकाकडून सदर प्रकल्प राबविणेकरीता तज्ञ आर्किटेक्टची नियुक्ती करुन प्रशासनाने प्रकल्प सुरु करुन योजना लवकरात लवकर पुर्ण करणेकरीता प्रस्ताव 01 महिन्यात महासभेत सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच काशीगाव मेट्रो 9 कामात विकास योजना रस्त्यांमधील जागा भुसंपादन करावयाचा प्रस्ताव प्रशासनाने जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे पाठविला आहे. सदर जागा भूसंपादनाव्दारे ताब्यात घेण्यास व खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या नविन धोरणानुसार केंद्र शासनाच्या जागेवरील वसाहतींची (झोपडपट्टया) जागा ताब्यात घेण्यासाठी राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस, ही सभा मान्यता देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- Dharmale

शीतल ज्योत्स्ना हसनाळे

अनुमोदन :- Anu132

श्री. अजित शि-शेसले

ठराव सर्वानुमते / ~~बहुमताने~~ मंजुर

Dmehta

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.२२/०६/२०२६

प्रकरण क्र.४२ :- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत होणा-या अनधिकृत बांधकामास जबाबदार असणा-या कर्मचारी व अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करणे आणि अनधिकृत बांधकाम रोखणेकरीता प्रशासनाने उपाययोजना करणेबाबत निर्णय घेणे.

ठराव क्र. :- ४४

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत अनधिकृत बांधकाम होऊ नये, याबाबत मा. महापौर यांनी अनधिकृत बांधकामाबाबत झिरो टॉलरंन्स पॉलिसी जाहिर केली होती. सर्व प्रभाग अधिकारी, उपायुक्त अतिक्रमण,अतिरिक्त आयुक्त अतिक्रमण, मा.आयुक्त या सर्वांना मा.महापौरांनी अनधिकृत बांधकामावर कडक कारवाई करणेबाबत निर्देश दिले होते.

याउपरही शहरामध्ये अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण समस्या दिवसेदिवस गंभीर होत आहे. अनेक लोकप्रतिनिधी, शहरातील नागरिक वारंवार तक्रार करुनही प्रशासनातर्फे कारवाई अपेक्षेप्रमाणे होत नाही. अनधिकृत बांधकामावर नियंत्रण व कार्यवाही करणेस प्रशासनास अपयश आल्याचे दिसत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियंमाच्या तरतूदीनुसार तसेच शासन निर्णय दि.28/02/2008, दि.02/03/2009, दि.06/05/2016, दि.10/03/2017, दि.03/05/2018 व दि.25/04/2025 प्रमाणे महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर नियंत्रण ठेवणे, निष्काशित करणेची जबाबदारी, सर्व प्रभाग अधिकारी, उपायुक्त अतिक्रमण, अतिरिक्त आयुक्त अतिक्रमण, मा.आयुक्त यांची असून त्यावर अमंलबजावणी झाल्याचे दिसून येत नाही. याउपर अनधिकृत बांधकाम झालेल्या कार्यक्षेत्रातील जबाबदार अधिका-यांवर पालिका प्रशासनाने त्यांना व्यक्तीश जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करणे अपेक्षित असतानाही अद्यापपर्यंत अधिकां-यावर निष्काशित व निलंबनाची कार्यवाही केली नाही.

शासनाने पारित केलेल्या निर्णयानुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनधिकृत बांधकामाबाबतच्या तरतुदीनुसार प्रशासनाने अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण यांच्यावर कारवाई करण्याची जबाबदारी संबधित अधिका-यांवर असून अंतिम जबाबदारी मा. आयुक्तांची आहे. त्यामुळे मा. आयुक्तांनी याबाबत कडक कारवाई करुन अहवाल महासभेत सादर करावा. तसेच यापुढे अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण निष्कासन, अनधिकृत फेरीवाले, विविध स्टॉल्स, गॅरेजेस इत्यादींवर केलेल्या कार्यवाहीबाबतचा मासिक अहवाल वेळोवेळी मा. महासभेस सादर करावा.

अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निष्काशित करण्याची मोहिम राबविणेकरीता मनुष्यबळ कमी असल्यास तात्पुरत्या स्वरुपात तीन महिन्यांच्या कालावधीकरीता मनुष्यबळ उपलब्ध करणेस व येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. हसमुख गेहलोत

अनुमोदन :- श्री. मनोज दुबे

ठराव सर्वानुमते / ~~बहुमताने~~ मंजुर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. महासभा दि.२२/०६/२०२६

प्रकरण क्र. ४३ :- महासभेचे थेट प्रक्षेपण सुरु करणेबाबत.

प्रकरण क्र. ४४ :- बी.ओ.टी तत्वावर बांधण्यात आलेल्या मार्केटची निविदा रद्द करणेबाबत.

प्रकरण क्र. ४५ :- विकासकांना (बिल्डर्सना) पुनर्विकासाच्या माध्यमातून लाभ पोहोचविण्याच्या उद्देशाने महानगरपालिकेच्या स्ट्रक्चरल ऑडिट विभागामार्फत धोकादायक नसलेल्या इमारतींनाही संशयास्पद पद्धतीने धोकादायक घोषित करून नोटिसा बजावणे, रहिवाशांवर घरे खाली करण्यासाठी दबाव निर्माण करणे, संभाव्य भ्रष्टाचार व संगनमतास प्रतिबंध करण्यासाठी निष्पक्ष चौकशी समिती गठित करणे, पुनर्निरीक्षण, अंतरिम स्थगिती तसेच थर्ड पार्टी स्ट्रक्चरल ऑडिट व्यवस्था लागू करण्याबाबत.

प्रकरण क्र. ४६ :- शहरातील खेळाची मैदाने आणि उद्यानामध्ये विविध संस्थाना व्यावसायिक / खाजगी कार्यक्रम आयोजित करणेस परवानगी न देणेबाबत.

ठराव क्र. (४५)

"ज" अन्वये आलेले सर्व प्रस्ताव फेटाळण्यात येत आहेत. प्रशासनाने आलेल्या प्रस्तावाचे गांभिर्याने विचार विनिमय करून आवश्यक / अतिमहत्वाचे प्रस्ताव वाटल्यास रितसर मा. महासभेपुढे सादर करावेत, तसेच यापुढे महासभेकरीता "ज" अन्वये प्रस्ताव सदस्यांनी सादर केल्यास त्यातील अतिमहत्वाचा / आवश्यक वाटल्यास मा. महापौरांनी एकच प्रस्ताव मा. महासभेच्या विषयपत्रिकेवर घ्यावा, असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री भगवती शर्मा

अनुमोदन :- श्री मदन सिंग

ठराव सर्वानुमते / ~~बहुमताने~~ मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.२२/०६/२०२६

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड' के अन्वये प्रस्ताव.)

प्रकरण क्र.(४७) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर पश्चिम सुभाषचंद्र बोस मैदान ते डोंगरी पर्यंत विकास योजनेत ३० मीटर रुंदीचा रस्ता बनविण्याकरीता प्रस्ताव .

ठराव क्र. ४६

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर पश्चिम सुभाषचंद्र बोस मैदान ते डोंगरी पर्यंत विकास योजनेत ३० मीटर रुंदीचा रस्ता एम.एम.आर.डी.ए. निधीतून बनविण्याचा प्रस्ताव एम.एम.आर.डी.ए. प्राधिकरणाकडुन दि.१६/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेस कळविण्यात आलेला आहे.

त्या अनुषंगाने सदर काम हे एम.एम.आर.डी.ए. निधीतून करुन घेण्यास व त्याकामी निविदा मागविणेस मान्यता देण्याचा प्रस्तावास, ही सभा मान्यता देत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

सौ. वर्षा भरत शिरसाट

सुचक :- Va. Bhosale

श्रीम. वर्षा भानुशाली

अनुमोदन :-

श्री. संजय थरथरे

ठराव सर्वानुमते / ~~बहुमताने~~ मंजुर

Dmehta

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा० महासभा दि २४०६२०२६

ठराव क्र० ४७ :-

शोकप्रस्ताव

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक तथा माजी स्थायी समिती सभापती कै. दिनेश दगडू नलावडे यांच्या दु:खद निधनाबद्दल मिरा-भाईंदर महानगरपालिकेची महासभा तीव्र शोक व्यक्त करते.

कै. दिनेश दगडू नलावडे यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षातून केली. सामाजिक, राजकीय व सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत राहून त्यांनी आपल्या कार्यकुशलतेचा, प्रामाणिकपणाचा व जनसेवेच्या वृत्तीचा ठसा उमटविला. सर्वसामान्य नागरिकांशी जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित करून त्यांनी लोकप्रतिनिधी म्हणून जनतेचा विश्वास व आदर संपादन केला.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून कार्य करताना त्यांनी विविध विकासकामांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. तसेच स्थायी समिती सभापती यांसारखी जबाबदारी यशस्वीपणे पार पाडून प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्यात समन्वय साधण्याचे कार्य केले. त्यांची शांत, संयमी, अभ्यासू व लोकाभिमुख कार्यपद्धती सर्वांसाठी प्रेरणादायी होती.

त्यांच्या निधनामुळे मिरा-भाईंदर शहराच्या सामाजिक व राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली असून एक कर्तव्यदक्ष, लोकाभिमुख व लोकप्रिय जननेता काळाच्या पडद्याआड गेला आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची महासभा दिवंगत कै. दिनेश दगडू नलावडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करते. तसेच ईश्वरचरणी प्रार्थना करते की, त्यांच्या पुण्यात्म्यास चिरशांती लाभो व त्यांच्या दु:खित कुटुंबीयांना हे दु:ख सहन करण्याचे बळ प्राप्त होवो.

"भावपूर्ण श्रद्धांजली."

ठराव सर्वानुमते मंजूर

Dhruta
महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

सौ. ज्योत्स्ना हसनाळे
सौ. वर्षिला बगाजी
श्री. अनिल सावंत